REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# गणेश श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब खापर्डे यांचे नाटय क्षेत्रातील कार्य

**डॉ. निलीमा राऊत**
डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर.



**सारांश :**
महाराष्ट्र नाटकवेडा आहे तसेच विदर्भ देखील नाटयवेडा आहे. नाटय रसिक आहे अभिनय संपन्न आहे. महाराष्ट्र रंगभूमीला वैभव प्राप्त करून देणाऱ्या विदर्भाला अभिमान वाटावा अशी वैदर्भिय नाटय परंपरा आहे,प्राचिनता आहे. ब्रिटीशांच्या पाशवी सत्तेला आव्हान देण्याचा प्रयत्न आपल्याकडे नाटकातून झाला. दादासाहेब सारखे चांगले नाटय दिगदर्शक अमरावतीत झाले.

## प्रस्तावना :
गणेश श्री कृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे हे विदर्भाच्या इतिहासातील विलक्षण चैतन्यपूर्ण व्यक्तीमत्व होते. विदर्भातील नामांकीत वकील होते. भारतमातेला ब्रिटिशांच्या शृंखलेतून मुक्त करण्यासाठी ज्यांनी राष्ट्रीय चळवळीमध्ये भाग घेवून आपले सर्वस्व अर्पण केले असे महापुरूष विदर्भाचे असले तरी त्यांच्या कार्याची व्याप्ती भारतभर राहिली. अशा महान पुरूषाचा जन्म २७ ऑगस्ट १८५४ रोजी हिंगोली येथे झाला.

दादासाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वात कलाकार, रसिक म्हणून ते विख्यात होते. त्यांचे कला जीवन रसिकतेने परिलुप्त आहे. त्यासाठी त्यांनी अनेकदा मुक्त हस्ते धनदान दिलेले आहे.

श्री दादासाहेबांना रंगभूमीचे फार आकर्षण होते. नाटयकला त्यांच्या रोमारोमात भरली होती. सुरूवातीच्या काळात अमरावतीच्या रंगभूमीत संजीवन ओतून तिला तेजस्वी बनविण्याचे महान कार्य दादासाहेबांनी केले.

## नाटकाबदलचे प्रेम
शाळेच्या विदयार्थ्यांना नाटके बसवून त्यांच्याकडून रंगभूमीवर प्रयोग करून घेण्याची दादासाहेबांना फार हौस होती. इ. स. १८९९ साली दादासाहेबांनी दर्यापूरला शाळेसाठी गुणोत्कर्ष नावांचे नाटक बसवून दिले.[१] तेव्हापासून त्यांचे रंगभूमी विषयक आकर्षण वाढत गेले. कोर्टाची किंवा राजकारणची कामे नसली म्हणजे ते नाटकाचा पिच्छा करीत.

मुलांना उन्हाळयाच्या सुटया लागल्या की दादासाहेब त्यांना नाटक शिकविण्याचे काम आपल्याकडे घेत. एकसारखे सहा -सहा तास ते हे काम आनंदाने करीत एकच अभिनय किती प्रकारे करता येईल आणि त्यातील उत्तम कोणता हे ठरवितांना ते बरीच मेहनत करीत असत. यावरून त्यांना नाटयकलेची कीती आवड होती हे लक्षात येते.

## नाटय संस्थांना मदत
नाटय व अभिनय या कलांचे ते इतके निष्णात व मर्मज्ञ रसिक होते की नाटय संस्था, कसलेले नट व नाटककार त्यांच्या जवळून आपल्या विषयाचे धडे घेत. या कला प्रियतेसाठी त्यांना आर्थिक झिज सोसावी लागली.[२] दादासाहेबांना नाटयकलेची खूपच आवड असल्याचे त्यांनी या कलेला उत्तेजन देण्याच्या दृष्टीने अनेक नाटक कंपन्यांना अर्थसहाय्य केले उभ्या महाराष्ट्रातील नाटक कंपन्यांना श्री दादासाहेबांनी मदत केली. एखादी नाटक कंपनी अमरावतीत येवून जर मोडली तर त्यातील नटाची त्यांच्या गावी पोहोचण्याची रेल्वे भाडे भरण्याची जबाबदारी दादासाहेब घेत.[३]

## नाट्य दिग्दर्शन

दादासाहेबांसारखे चांगले दिग्दर्शक अमरावतीत झाले. त्यांचे दिग्दर्शन इतके प्रसिध्द झाले की, नाटकात दिग्दर्शनाची खापर्डे शैली म्हणून नाव प्रचारात आले. अमरावतीत आलेले प्रत्येक नाटक कंपनी मग ती मराठी असो, गुजराथी असो, उर्दु असो वा पारशी असो या सर्वांशी दादासाहेबांचा बराच संबध आला. अमरावतीत या काळी चार नाटक कंपन्यांचे प्रयोग सुरू होते. यामध्ये बाळशास्त्री वाशीम करांची करूनेश प्रासादिक कोल्हापूरकर संगीत कंपनी पार्शीथियटर कंपनी की जी उर्दुत प्रयोग करीत असे शाहूनगरवाशी कंपनी या चार ही कंपन्यांचे प्रयोग पाहण्याचे दादासाहेबांना आग्रहाचे आमंत्रणे असत त्यांच्या सर्वांच्या आग्रहाला मान देवून दादासाहेब नाटकाला जात. परांजपे याची नाटक कंपनी अमरावतीला आली असताना ते २४ तासांपैकी २० तास दादासाहेबाकडे बसत आणि त्यांना आपली नाटके वाचून दाखवित.

'रामराज्य वियोग' हे त्यांचे प्रमुख उत्पन देणारे नाटक होते. त्याची प्रवेशरचना दादासाहेबानीच करून दिली होती. [४]

हरीनारायण आपटे यांच्या 'जयध्वज' नाटकाची तालीम घेवून त्यात काही सूचना दादासाहेबांनी केल्या. त्यांनी दादासाहेबांच्या दिग्दर्शन कौशल्याची फार प्रशंसा केली [५] सामाजीक नाटक कंपनीला अमरावतीत मुक्काम असतांना 'आयेल्लो' व 'त्रटिका' हे नाटक बसवून दिले. [६]

'मुद्राराक्षस' हे नाटक दादासाहेबांनी बसवून स्वत: नाटकाच्या तालीत घेतल्या हे नाटक स्त्री पात्र विरहीत होते. अकोला या ठिकाणी स्नेहसम्मेलनाच्या वेळी दि. १६ मार्च १९०० रोजी या नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग करण्यात आला. [७]

पुढे जनतेच्या आग्रहावरून अमरावतीमध्ये 'मुद्राराक्षस' या नाटकाचा प्रयोग ३० मार्च रोजी सादर करण्यात आला. या नाटकात शंकुतलेचे काम एका मुसलमान व्यक्तिने केले होते. स्वतः दादासाहेबांनी कण्व मुनीची भुमीका केली होती. [८]

गोपाळराव बेडेकर हे दादासाहेबांच्या हाताखाली म्यु. कमिटीत नोकर होते त्यांनी एक नाटक कंपनी काढली. या कंपनीचे सर्वात पहीले 'सौभद्र' हे नाटक २८ जुलै रोजी दादासाहेबांनी बसवून दिले तर सप्टेंबर महिन्यांत 'विक्रमोवंशीय' हे नाटक बसवून दिले. तर नोव्हेंबर महिन्यात 'ताशा' हे नाटक बसवून दिले. हे नाटक ' रोमियो ॲंड ज्युलीयट' चे मराठीत रूपांतर होते. [९]

नाशिकवरून 'महाराष्ट्र हितेच्छु' नावाची कंपनी अमरावतीत आली होती. अभ्यंकर नावाच्या एका गृहस्थाने आग्रहाने या कंपनीमध्ये नेले व त्यांचा अंक दादासाहेबांनी बसवून दिला. [१०]

इ.स. १९०१ च्या सुमसरास अमरावतीत 'अमॅच्यूर' नावाची नाटक कंपनी खपडर्यांच्या प्ररणेने सुरू झाली या कंपनीचे प्रमुख चालक गोपाळराव बेडेकर हे होते. या कंपनीला ' ॲटोनी ऑफ क्लिओपात्रा' या शेक्सपियरच्या नाटकाचे भाषांतर दादासाहेबांनी करून दिले [११] ते बसवूनही दिले यासाठी बराच वेळ व पैसा खर्ची पाडला. दादासाहेब स्वत: नाट्यसमिक्षक होते. ल.ना.जोशीकृत 'समर्थ रामदास' या नाटकातील एक प्रवेश दादासाहेबांच्या सूचनेवरून पुन्हा लिहीण्यात आला होता[१२]

किर्लोस्कर मंडळाचे 'मुळ मंजूशा' इ.स. १९०२ मध्ये दत्तप्रसारीत मंडळीची 'संयोगिता' ही १९०३ मध्ये दादासाहेबांनी दिग्दर्शीत केलेली नाटके होती या विविध नाट्यकलेतून दादासाहेबांनी समाजप्रबोधन आणि राजकिय जागृती घडवून आणली. [१३]

दादासाहेबांनी 'अमॅच्युर नाटक' नाटक मंडळी स्थापन केली व या कंपनीव्दारे त्यांनी मृच्छकटिक, शाकुंतल, विक्रमोवंशिय, ॲज यु लाइक इट, क्लिओपाट्रा , ॲथेल्लो इत्यादी नाटके भाषांतर व दिग्दर्शन करून रंगभुमीवर आणले. [१४]

## नाट्यसंम्मेलनाचे अध्यक्ष

कै. अनंत वामन बरवे हे दादासाहेबांचे कडे राहायचे ते स्वत: दर्दी कलाकार आणि जाणकार रसीक होते. दादासाहेबांचे रगंभूमीवरील प्रेम लक्षात घेवून नाटक मंडळाचे संम्मेलन भरवावे व अध्यक्षपद दादासाहेबांना द्यावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती. त्याच्याच प्रयत्नाने दि. २८ ऑगस्ट १९०५रोजी भारतातील पहीले नाट्य संम्मेलन मुंबईला 'बॉम्बे थिएटर' मध्ये भरले व दादासाहेब खापर्डे या नाट्यसम्मेलनाचे अध्यक्ष होते. [१५] या नाटकात एकंदर १३ मंडळया सहभागी झाल्या होत्या. [१६]

दुसरे नाटय संम्मेलन नाशिकला भरले त्याचे अध्यक्ष लो. टिळक होते तेथे 'अभिनय' या विषयावर दादासाहेबांचे उत्कृष्ठ असे भाषण झाले [१७] अकोला येथे १९२२ मध्ये श्री हरीभाऊ आपटे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संम्मेलनाचे दादासाहेबांचे 'कवी' या विषयावरील गहणीय भाषण झाले. [१८]

दर्यापूर या गावी अमरावतीत हायस्कुलच्या आजी ,आणि माजी विद्यार्थ्यांचे मार्च महिन्यात स्नेहसंम्मेलन झाले त्याचे अध्यक्ष दादासाहेबच होते.

दादासाहेबांसारखे चांगले नाटयदिग्दर्शक अमरावतीला झाले त्यामुळे अमरावती ही संगीताच्या लयीतच वाढली. गणपतराव जोशी, बालगंधर्व, चिंतामणराव कोल्हटकर इत्यादी श्रेष्ठ नटांनी आत्मचरीत्रे लिहीली त्या पुस्तकात दादासाहेबांचे स्मरण व प्रंशसा आढळते. दादासाहेबांनी अमरावती क्षेत्र नाटकसमिक्षाकार, कलाकार व नाटककार म्हणून गाजविले. [१९]

## सारांश :

दादासाहेब ललितकलेचे फार मोठे भोक्ते व आश्रयदाते होते, नाटयकला ही तर त्यांच्या रोमारोमात भरली होती. कुशल दिग्दर्शक म्हणूनही त्यांची ख्याती होती. शालेय विद्यार्थ्यांना तर अभिनय शिकविलाच पण धंदेवाईक नाटयमंडळयांनाही त्यांनी नाटके बसवून दिली. अनेक नाटक कंपन्यांना त्यानी अर्थसहाय्यही केले. त्यामुळेच २८ ऑगस्ट १९०५ मध्ये जे अगदी पहिले नाटय संम्मेलन महाराष्ट्रात भरले त्याच्या अध्यक्षत्वाची माळ त्यामुळेच त्यांच्या गळयात पडली.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. सौ. प्रतिभा कुळकर्णी , विदर्भातील नाटककार , प्रकाशक - रिशा बुक्स इंटरनॅशनल , मुंबई प्रथमावृत्ती - २००७ पृ. १२.
२. सौ. संपदा कुल्लरवार, गणेश श्रीकृष्ण खोपर्डे जिवन आणि कार्ये, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती - २०१५ पृ. ३५.
३. वा.ब., खापर्डे, गणेश श्रीकृष्ण उपााख्य दादासाहेब खापर्डे यांचे जिवन चरीत्र, मंगेश प्रकाशन, नागपूर , प्रथमावृत्ती - २००९ पृ.९१.
४. सौ. संपदा कुल्लरवार, उपरोक्त पृ.३४.
५. वा.बा.खापर्डे., उपरोक्त पृ.९१.
६. कित्ता , पृ.१०२.
७. भि.दे.,कारंजकर., अमरावती शहराचा इतिहास, प्रकशक - श्री. दा. मुळे, अमरावती, प्रथमावृत्ती - १९७८, पृ . २५३.
८. विदर्भातील नाटककार, उपरोक्त पृ.१२.
९. दादासाहेब खापर्डे चरित्र, उपरोक्त , पृ २३९.
१०. सौ.संपदा कुल्लरवार, उपरोक्त पृ.३४.
११. कित्ता.
१२. कित्ता.
१३. विदर्भातील नाटककार, उपरोक्त पृ.१३.
१४. कित्ता.
१५. सौ.प्रतिभा कुलकर्णी , विदर्भातील रंगकर्मी , प्रकाशक - विदया विकास पब्लिशर्स प्रा. लि. नागपूर, प्रथमावृती २००३, पृ.१.
१६. विदर्भातील रंगकर्मी, उपरोक्त पृ.३.
१७. वा.बा. खापर्डे, उपरोक्त पृ ९१.
१८. सौ. संपदा कुल्लरवार,उपरोक्त, पृ. ३५.
१९. विदर्भातील नाटककार, उपरोक्त पृ १२.